आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

शनिवार, दिनांक २४ ऑगस्ट २०२४

ठळक बातम्या

1. उद्या जळगाव इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी ११ लाख लखपती दिदींना प्रमाणपत्र वितरीत करणार.
2. आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता देशवासियांशी साधणार संवाद.
3. महिला सशक्तीकरण कार्यक्रमांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती मेळावा आज यवतमाळ इथं संपन्न.
4. बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडी आणि भाजपतर्फे राज्यात विविध ठिकाणी निदर्शनं.
5. जातीच्या राजकारणामुळे एकूण समाज विस्कटला असल्याचं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचं नागपुरात प्रतिपादन.
6. विदर्भात सर्वत्र ढगाळ वातावरण- अकोला आणि अमरावतीसाठी सतर्कतेचा ऑरेंज अलर्ट जारी.

****

लखपती दिदी/मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या जळगाव इथं येणार आहेत. त्यांच्या हस्ते अकरा लाख लखपती दीदींना प्रमाणपत्रांचं दूरस्थ पद्धतीनं वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात पंतप्रधान, लखपती दीदींशी संवाद साधतील. पंतप्रधानांच्या हस्ते दोन हजार पाचशे कोटी रुपयांचा ‘सामुदायिक गुंतवणूक निधी’ हा पुनरावर्ती निधी यावेळी जारी करण्यात येणार आहे. या फिरत्या निधीचा फायदा २ लाख ३५ हजार चारशे स्वयंसहाय्यता गटांच्या सुमारे २५ लाख ८० हजार सदस्यांना मिळणार आहे. ३४ राज्यांमधल्या जवळजवळ ३० हजार ठिकाणांहून या कार्यक्रमात लखपती दीदी दूरदृष्यप्रणाली द्वारे सहभागी होणार आहेत. दरम्यान, उद्या सकाळी ११ वाजता, आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रम मालिकेतून पंतप्रधान देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११३ वा भाग तर या कार्यक्रम मालिकेच्या तिसऱ्या आवृत्तीचा हा तिसरा भाग असेल.

अमित शाह बैठक

छत्तीसगडची राजधानी रायपूरमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली नक्षलग्रस्त राज्यांच्या आंतरराज्य समन्वय समितीची बैठक आज पार पडली. छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई, केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय, छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा हेही या बैठकीत उपस्थित होते. त्याचप्रमाणे छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणा, आणि महाराष्ट्र या नक्षल प्रभावित राज्यांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक तसेच केंद्र आणि राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. आजच्या बैठकी नंतर, शाह छत्तीसगडच्या नक्षलग्रस्त प्रभावित क्षेत्रांमध्ये सुरक्षा आणि विकासाशी संबंधित समस्यांचा आढावा घेण्यासाठी आणखी एक बैठक घेणार आहेत.दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार नक्षलवादाच्या संपूर्ण निर्मूलनासाठी कटिबद्ध असल्याचं' प्रतिपादन शाह यांनी समाज मध्यमावरील संदेशात केलं आहे.

महिला सशक्तीकरण मेळावा

महिला सशक्तीकरण कार्यक्रमांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मेळावा आज यवतमाळ मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला. राज्य सरकार महिलांच्या सुरक्षेसाठी वचनबद्ध असून त्यासाठी विविध उपाययोजना करण्याचं आश्वासन राज्य सरकारच्या वतीनं आज देण्यात आलं. ही योजना केवळ मत वाढवण्यासाठी नसून महिलांची पत आणि मान वाढवण्यासाठी असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. तर लाडकी बहीण योजनेसह बहीणींना सुरक्षा देऊ, इच्छुक असलेल्या शेवटच्या महिलेपर्यंत ही योजना पोहचवू असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. आतापर्यंत सव्वा कोटी महिलांहून अधिक लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. पुढच्या महिन्यातही अर्ज जमा केले तरी जुलैपासूनचे पैसे दिले जातील, असं ते म्हणाले. सरकार बहिणींच्या सुरक्षेसाठी वचनबद्ध असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

बदलापूर निषेध

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणात सरकारच्या निषेधार्थ आज महाविकास आघाडीच्या घटकपक्षांतर्फे राज्यात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आलं. या मुद्द्यावर पुकारलेला बंद बेकायदेशीर असल्याचा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिल्यानंतर आज केवळ निदर्शनं करण्याचा निर्णय आघाडीने घेतला. मुंबईत दादर इथं शिवसेना भवनासमोर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे

आंदोलन करण्यात आलं. आरोपीला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला.नागपुरात आज  सकाळी काँग्रेस कडून काळ्या फिती बांधून संविधान  चौकात मूक आंदोलन करण्यात आलं. या आंदोलनात  विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, शहराध्यक्ष विकास ठाकरे, आमदार अभिजित वंजारी यांसह  स्थानिक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी  काळ्या फिती बांधून निषेध नोंदविला. गडचिरोली इथं खासदार डॉ.नामदेव किरसान यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आलं. त्याचप्रमाणे वाशीम, गोंदिया, आणि भंडारा इथं महाविकास आघाडीच्या नेते आणि कार्यकर्त्यांकडून तोंडावर काळी पट्टी बांधून निषेध व्यक्त करण्यात आला. बदलापूर घटनेतील नराधमाला जलद गती न्यायालयात खटला चालवून फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

भाजप/ 'जागर जाणिवेचा'

बदलापूर इथं  झालेली दुर्दैवी घटना मानवतेला काळीमा फासणारी असून अशा घटना होऊ नयेत म्हणून भाजपने आज  महाराष्ट्रभर 'जागर जाणिवेचा' हे अभियान राबविलं. भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकाळी अमरावती येथील इर्विन चौकात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मौन धारण केलं. "केवळ बदलापूरच नव्हे, जिथे कुठे अशा घटना घडतात त्या राजकारणाचा विषय कदापि होऊ शकत नाही. मानवतेला त्या काळिमा फासणाऱ्या असतात. ही प्रवृत्ती समाजाने ठेचून काढली पाहिजे," अशी प्रतिक्रिया बावनकुळे यांनी  पत्रकारांशी बोलताना दिली. या अभियानात शेकडो भाजपा कार्यकर्त्यांनी उपस्थिती नोंदवून सहवेदना व्यक्त केल्या.

राज ठाकरे नागपूर दौरा

लोकसभा निवडणुकीत  महाविकास आघाडीला जे मतदान झालं, त्यात मोदी आणि शाह यांच्या विरोधात एकगठ्ठा मतदान होतं. त्यात भाजपच्या काही उमेदवारांनी संविधान बदललं जाणार अशा आशयाचं विधान केलं आणि त्यातून मोठ्या प्रमाणावर दलित समाजाने भाजपच्या विरोधात मतदान केलं. लोकसभेला जे घडलं ते विधानसभेला घडेल असं समजू नका, असं मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केलं.  आगामी विधानसभेच्या पार्श्वभूमीवर  नवनिर्माण यात्रेच्या दरम्यान आज नागपुरात ठाकरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. महाराष्ट्रात जातीचं राजकरण शरद पवारांनी सुरु केल्याचा आरोप करत एकूणच समाज विस्कटला आहे, असं ते म्हणाले. लहान मुलांच्या मनात जर

जातीची जाणीव निर्माण होत असेल तर हे गंभीर असल्याचं मत देखील त्यांनी व्यक्त केलं.

राज्यपाल आचार्य देवव्रत

गुजरातचे राज्यपाल आणि कृषितज्ज्ञ  आचार्य देवव्रत लिखित "प्राकृतिक खेती" या हिंदी पुस्तकाच्या, मराठी आवृत्तीचं प्रकाशन  देवव्रत यांच्या उपस्थितीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा हस्ते उद्या सकाळी ११ वाजता  डॉ.वसंतराव देशपांडे स्मृती सभागृह, नागपूर इथं होणार आहे. त्याचबरोबर ॲग्रोव्हिजन शेतकरी प्रशिक्षण केंद्राचेही भूमिपूजन यावेळी देवव्रत यांच्या हस्ते होणार असून त्यानंतर ते रेशीमबाग येथील महर्षी व्यास सभागृहात सायंकाळी **6** वाजता होणा-या एकलव्य एकल विद्यालयाच्या शिक्षक-पर्यवेक्षक प्रशिक्षण वर्गाच्या समारोपीय कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

सुपर ७५

शिक्षणाच्या माध्यमातून अनेक चांगल्या संधी विद्यार्थ्यांपुढे उपलब्ध होतात. शिक्षण हा चांगल्या भविष्याचा पाया आहे. इयत्ता ९ वी ते १२वी या चार वर्षात योग्यरित्या मेहनत केल्यास पुढील संपूर्ण आयुष्य हे आनंददायी ठरते, असं  प्रोत्साहनपर मार्गदर्शन नागपूर  मनपाच्या अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांनी केलं. मनपा शाळेतील विद्यार्थ्यांचे डॉक्टर, इंजिनीयर, वकील, लष्करात अधिकारी बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'सुपर ७५' योजने अंतर्गत नवीन शैक्षणिक वर्षात निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिकवणी वर्गाचा प्रारंभ आज अतिरिक्त आयुक्त आंचल गोयल यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. मनपाच्या नेताजी मार्केट हिंदी माध्यमिक शाळा, इथं आयोजित या छोटेखानी समारंभात मनपाच्या शिक्षणाधिकारी साधना सयाम, सुपर ७५ चे संयोजक प्रशांत टेंभुर्णे यांच्यासह विद्यार्थी आणि पालक प्रामुख्यानं उपस्थित होते.

नेपाळ बस दुर्घटना

नेपाळमध्ये पर्यटनासाठी गेलेल्या जळगाव जिल्ह्यातील **24** जणांचा काल बस नदीत पडून झालेल्या अपघातात  मृत्यू झाला. नेपाळमधल्या अपघातग्रस्तांना भारतात परत आणण्याच्या प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी युवा कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे नेपाळची राजधानी काठमांडू इथं पोहोचल्या आहेत. त्यांनी त्रिभुवन विद्यापीठ रुग्णालयालाही भेट देऊन जखमींची विचारपूस केली. राज्य सरकारच्या विनंतीनुसार त्यांचे मृतदेह भारतीय हवाई दलाच्या विमानाने आज नाशिक इथं आणले जाणार आहेत.

हवामान

नागपुर जिल्ह्यात आज अनेक ठिकाणी पावसाची नोंद झाली आहे. येत्या काही तासांत विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटांसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. आज अकोला आणि अमरावती इथं सतर्कतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून बुलढाणा, वाशीम, यवतमाळ आणि गडचिरोलीसाठी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उद्या संपूर्ण विदर्भासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला असून बुलढाणा आणि अकोल्यात मुसळधार पाऊस पडू शकतो.

कंत्राटी कामगार मोर्चा

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीनं - वेतन वाढ ,कंत्राटदार मुक्त आणि शाश्वत रोजगार अशा अनेक मागण्यांसाठी आज नागपुरात रेशीमबागपासून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानापर्यंत पायी मोर्चा काढण्यात आला. यात मोठया संख्येनं कंत्राटी कामगार सहभागी झाले होते.

*****